**छोट्या नाण्यांचा स्वीकार**
**मे ३०, २००३**

काही वृत्तपत्रातील बातम्या व येणाऱ्या तक्रारींमधून ज्ञात झाले आहे की बँका, वाणिज्य संस्था व आम जनता ५, १० व २० पैशांची छोटी नाणी स्वीकारत नाहीत, कारण की नाणी वैध चलन राहिली नाहीत असा समज आहे. भारतीय रिझर्व बँकेतर्फे स्पष्ट करण्यात येते की जरी या नाण्यांचे उत्पादन व वितरण बंद झाले असले, तरी भारत सरकारकडून ती रद्द करण्यात आलेली नाहीत. पूर्वी वितरित केलेली अशी सर्व नाणी अजूनही वैध चलन आहेत व सर्व संबंधितांनी ती स्वीकारली पाहिजेत. बँकांवर ही नाणी स्वीकारणे बंधनकारक असून, ही नाही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या जवळच्या शाखेत बदलून मिळतील.

**पी.व्ही. सदानंदन**
**व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-०३/१२२३**